स्थायी निर्देश क्र. १६-२०२४

**राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायती कडून सक्तीचे व ऐच्छिक तसेच मंजूर उपविधीनुसार वसूल करावयाचे कर/शुल्क इत्यादींची वसुली.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी बेलापूर.डी.बी.मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रसं/प्र.क्र.१३/स्थायी नि./१६/२०२४/नप सक्ती व ऐच्छि./मं.उपविधी व.कर/शुल्क/क-१२/ ६५६०**
**दिनांक :- 15 OCT 2024**

**संदर्भ:- १)** या कार्यालयाचे पत्र क्र. नपसू १०२२/प्र.क्र.११२/२००२/६, दिनांक ०३ जुन २००२

**प्रस्तावना:-**

राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायती कडून सक्तीचे व ऐच्छिक तसेच मंजूर उपविधीनुसार वसूल करावयाचे कर/शुल्क इत्यादींची वसुलीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. नपसू १०२२/प्र.क्र.११२/२००२/६ अन्वये स्थायी निदेश क्र.१७ निर्गमित करण्यात आला होता. नगरपरिषदां/नगरपंचायती मधील सद्यस्थिती पाहता या स्थायी निदेशामध्ये बदल करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०५ व १०८ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने लागू केलेले सक्तीचे व ऐच्छिक करानुसार तसेच उक्त अधिनियमांचे कलम ३२२ नुसार नगरपरिषदेने मंजूर केलेल्या उपविधीतील तरतुदीप्रमाणे वसुल करावयाचे कर व फी इत्यादी लागू करणे, त्याची आकारणी करणे या बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. यास्तव खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश:-**

**०१.** काही नगरपरिषदांकडून या महत्त्वाच्या उत्पन्नाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे अशा नगरपरिषदांना फार मोठया उत्पन्नापासून वंचित रहावे लागलेले आहे व आर्थिक नुकसान झालेले आहे, असे यापुढे घडू नये म्हणून सर्व नगरपरिषदांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**०२.** शासनाकडून वेळोवेळी बंधनकारक करण्यात आलेले तसेच अधिनियमात नमूद असलेले सर्व बंधनकारक कर, शुल्क इत्यादी यांची आकारणी करून त्याचे वसुलीसाठी नियमित प्रयत्न होणे आवशयक आहे. नगरपरिषदांच्या उत्तम आर्थिक व्यवस्थापनाकरिता शासनाने लागू केलेल्या सर्व सक्तिच्या व ऐच्छिक करांची/शुल्कांची तसेच नगरपरिषदांनी मंजूर केलेल्या उपविधीनुसार नगरपरिषदांनी मागणीपात्र कर व शुल्क यांची १००% वसुली होणेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्या. याकामी यापुढे दुर्लक्ष झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल व अशा होणा-या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबंधित पदाधिकारी व अधिकारी यांच्यावर निश्चित केली जाईल.

**०३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ अन्वये मुख्याधिका-यांनी प्रतिवर्षी नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सभागृहापुढे सादर करतांना लागू करण्यांत आलेले सक्तिचे व ऐच्छिक कर व शुल्कांबाबत तसेच नगरपरिषदेला आर्थिक उत्पन्न मिळवून देणा-या मंजूर उपविधीचा सविस्तर

तपशील सादर करावा. असा अहवाल सादर करतांना प्रत्येक कराचे व शुल्कांचे किमान व कमाल दर तसेच नगरपरिषदेने आकारलेले दर याची माहिती सभागृहाला द्यावी व यामधून विहित मर्यादेपर्यंत दर वाढ करून नगरपरिषदेच्या उत्पन्नात किती भर पडू शकेल याबाबतचा सुस्पष्ट प्रस्ताव मुख्याधिकारी यांनी सादर करावा.

**०४.** नगरपरिषदेने मंजूरी दिलेल्या अर्थसंल्पाची जिल्हाधिकारी यांचे वतीने मंजूरी देणेकामी छाननी करतेवेळी वरिलप्रमाणे मुख्याधिकारी यांनी अर्थसंकल्पासोबत अहवाल/प्रस्ताव सादर केलेला आहे अगर कसे याची खातरजमा करण्यात यावी .

**०५.** कायद्यातील तरतूदींनुसार दर चार वर्षांनी मालमत्तेचे पुर्नर्निधारण करणे आवश्यक आहे. परंतु अनेक नगरपरिषदांमध्ये वर्षानुवर्षे कर निर्धारणाचे पुर्नविलोकन करण्यात येत नाही. कर निर्धारणात सुधारणा न केल्यामुळे ब-याच नगरपरिषदांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. गलिच्छ वस्तीतील झोपडपट्टीचे कर निर्धारण करून त्यांचेकडून सक्तीने कर वसूली करण्याची कार्यवाही करण्यात यावी. झोपडपट्टी अधिकृत आहे की अनधिकृत आहे याचा विचार न करता कर आकारणी करणे आवश्यक आहे. त्याला कायद्याचे बंधन येणार नाही. अनधिकृत बांधकामे असली तरी ती करपात्र असतील, ही बांधकामे उभी आहेत तोवर त्यावर कर आकारणी करता येते. मात्र अनधिकृत बांधकामावर कर आकारल्यामुळे ती अधिकृत होत नाही याची जाणीव ठेवावी.प्रत्येक विभागातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांची चतुर्थ वार्षिक कर आकारणी प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण होईल याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी यांची असून याबाबत विभागीय कार्यालय प्रमुखांनी दर तीन महिन्याने आढावा घ्यावा.तसेच, चतुर्थ वार्षिक कर आकारणी प्रक्रिया पूर्ण होणेकरिता संबंधित मुख्याधिकारी यांना सर्वतोपरी सहकार्य करावे. याबाबत विभागीय कार्यालय प्रमुखांनी खालील नमुन्यात माहिती संकलित करून संचालनालयास सादर करावी.

| विभाग : | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण नगरपरिषद संख्या =<br>एकूण नगरपंचायत संख्या = | | | | | | |
| अ.क्र. | नगरपरिषद/ नगरपंचायत चे नाव | वर्ग | शेवटची चतुर्थ वार्षिक कर आकारणी केलेले वर्ष | पुढील चतुर्थ वार्षिक कर आकारणी करावयाचे वर्ष | रकाना ५ नुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी करण्यात आली आहे का? | नसल्यास कारणे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**०६.** ग्रामपंचायतीमधून नगरपंचायतीमध्ये रुपांतर झालेनंतर अशा ठिकाणी कर आकारणी बाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे संक्रमणकालीन तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याची (आगामी ५ वर्षापर्यंत) खात्री करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी यांची राहील. तसेच ५ वर्षे पूर्ण झाले नंतर कर आकारणी करिता अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाईल याची देखील खात्री संबंधित मुख्याधिकारी यांनी करायची आहे.तसेच याबाबत विभागीय कार्यालय प्रमुखांनी दर तीन महिन्याने आढावा घ्यावा. याकरिता खालील नमुन्यात माहिती संकलित करून संचालनालयास सादर करावी.

| विभाग : | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नगरपरिषद/ नगरपंचायत चे नाव | वर्ग | स्थापना वर्ष | स्थापनेला झालेली एकूण वर्षे | संक्रमण कालीन तरतुदी लागू | नसल्यास कारणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | काय ? | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**०७.** आढाव्या अंती, वैध कारणाशिवाय, ज्या नगरपरिषदा किंवा नगरपंचायती यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केली नसेल अशा नगरपरिषदा किंवा नगरपंचायती चे संबंधित मुख्याधिकारी हे नियमोचीत कारवाईस पात्र ठरतील व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव विभागीय कार्यालय प्रमुखांनी संचालनालयास सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालय प्रमुख हे जिल्हा कार्यालय प्रमुख यांचेकडून अहवाल प्राप्त करून घेऊन आवश्यक ती कार्यवाही करू शकतील.

**०८.** नगरपरिषदा किंवा नगरपंचायती क्षेत्रात विशेष कर वसुली मोहीम राबविणे, कर वसुलीबाबत जनजागृती करणे, नवीन मालमत्तांचा शोध घेऊन त्यांचेवर विहित कालावधीत कर आकारणी केली जाईल याचे प्रभावी नियोजन करणे, मोठे थकबाकीदार तसेच शासकीय मालमत्तांची थकीत रक्कम वसुल होण्यासाठी विशेष प्रयत्न करणे या व यासारख्या इतर आवशयक प्रयत्नाद्वारे मालमत्ता कर वसुली मध्ये वाढ करता येईल. विभागीय कार्यालय प्रमुख यांनी नगरपरिषदा किंवा नगरपंचायती चे एकूण मागणीच्या (मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या) प्रमाणानुसार त्यांना दरमहा वसुलीचे लक्ष्य देऊन प्रत्येक महिन्याच्या अंती झालेल्या वसुलीचा आढावा घ्यावा.ज्या नगरपरिषदा/ नगरपंचायती अपेक्षित लक्ष्य साध्य करीत नाहीत त्यांची माहिती विभागीय कार्यालय प्रमुखांनी दर ३ महिन्याने संचालनालयास द्यावी. याकरिता विभागीय कार्यालय प्रमुख यांनी खालील नमुन्यात माहिती संकलित करून संचालनालयास सादर करावी.

| विभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नगरपरिषद/ नगरपंचायत चे नाव | वर्ग | एकूण मागणी ( लक्ष रुपये) | तिमाही वसुलीचे लक्ष्य (रकाना क्र.४ /०४) | पहिल्या तिमाहीत ( एप्रिल ते जून ) प्रत्यक्षात झालेली वसुली (लक्ष रुपये) | पहिल्या तिमाहीत प्रत्यक्षात झालेली वसुली टक्केवारी (रकाना ६/ रकाना ४ ) *१०० |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**०९.** केंद्रीय वित्त आयोगाचे अनुदान राज्यास प्राप्त होण्याच्या दृष्टीने मालमत्ता कर वसुलीमध्ये दरवर्षी ठराविक वाढ करणे हा निकष बंधनकारक करण्यात आलेला असून याबाबत संचालनालय स्तरावरून वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे हे सर्व मुख्याधिकारी यांचेवर बंधनकारक आहे.अशी आवश्यक वाढ केली न गेल्यास संबंधित व नगरपरिषदा /नगरपंचायती व अप्रत्यक्षपणे राज्यास अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. अशी बाब संचालनालयाच्या निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी यांची राहील. सबब, ही परिस्थिती उद्भवू नये याकरिता मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत किमान १२ ते १५ टक्के इतकी वाढ होईल याबाबत दरवर्षी नियोजन करावे. (सदर टक्केवारी शासनाकडून दरवर्षी निश्चित केली जाईल).शासनाने निश्चित केलेल्या टक्केवारी नुसार वसुलीमध्ये वाढ करणे बाबत विभागीय कार्यालय प्रमुख यांनी सर्व मुख्याधिकारी यान अवगत करावे व वसुलीचे सदर लक्ष्य गाठण्यासाठी सुयोग्य कार्यवाही केली जात आहे याची वेळोवेळी खातरजमा करावी. याकरिता विभागीय कार्यालय प्रमुख यांनी खालील नमुन्यात माहिती संकलित करून सहामाही अहवाल संचालनालयास सादर करावा..

| विभाग : | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नगरपरिषद/ नगरपंचायत चे | वर्ग | मागील आर्थिक | निश्चित केलेल्या | सहामाही लक्ष्य ( रकाना ५/०२ ) | पहिले सहामाही साध्य केलेले वसुलीचे लक्ष्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नाव | | वर्षाची एकूण वसुली (लक्ष रुपये) | टक्केवारीनुसार चालू वर्षी करावयाची वसुली (लक्ष रुपये){(रकाना ४) + रकाना ४*शासन टक्केवारी /१०० )} | | (लक्ष रुपये) व टक्केवारी मध्ये |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

उदाहरणार्थ मागील वर्षी झालेली वसुली ही ५० लक्ष रुपये आहे. शासनाने निश्चित केलेली टक्केवारी ही ९ % आहे. तर, निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार चालू वर्षी करावयाची वसुली ( लक्ष रुपये) खालीलप्रमाणे असेल

= {(५०) + ( ५० * ९ )/१००}

= (५०) + (४५०/१००)

= (५०) + (४.५)

= ५४.५ लक्ष रुपये.

**१०.** उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणे व त्याचा वेळोवेळी आढावा घेण्याची जबाबदारी ही अनुक्रमे संबंधित मुख्याधिकारी, जिल्हा कार्यालय प्रमुख व विभागीय कार्यालय प्रमुख यांची असून या सर्वांनी आपापले स्तरावर नियामोचीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात कोणत्याही प्रकारची हलगर्जी अथवा निष्काळजीपणा झाल्यास किंवा त्यामुळे नगरपरिषदेस कोणतेही आर्थिक नुकसान झाल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

**११.** उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरिता गांभिर्यपूर्वक प्रयत्न केले जात नाही. नगरपरिषदेच्या उत्पन्नाचा स्त्रोत अत्यंत कमी आहे. त्यात हरप्रकारे वाढ करण्याचे प्रयत्न करणे अत्यंत जरूरीचे आहे. त्यामुळे खालील उपाययोजना अंमलात आणण्याचा विचार व्हावा.

अ. नगरपरिषदेच्या स्वतःच्या मिळकती, गाळे तयार करून त्याद्वारे नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविण्याच्या योजना तयार कराव्यात.

ब. पाणीपट्टीची वसूली मिटर पध्दतीने केल्यास किती उत्पन्न वाढेल याचा अभ्यास करून त्याप्रमाणे करावे जेणेकरून पाणीपुरवठा योजनेवरील खर्च पूर्णपणे भागविता येईल.

क. मालमत्ता करांचे निर्धारण करण्याकरीता नविन घरांचे मोजमाप दरवर्षी करावे. तसेच जून्या मालमत्तेबाबत नियमानुसार सुधारीत करनिर्धारण नियमित स्वरूपात करून त्याची वसूली लवकरात लवकर करण्यात यावी.
नगरपरिषदेच्या मालकीच्या इमारती ज्या प्राथमिक शाळांसाठी वापरल्या जातात, त्यांचे भाडे शासनाच्या शिक्षण विभागाकडून दिले जाते. तथापि या भाड्याची रक्कम मिळविण्यासाठी नगरपरिषदा, शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करीत नसल्याने ब-याच नगरपरिषदांना शिक्षण विभागाकडून अशी रक्कम येणे थकीत राहिलेली आहे, ती मिळविण्यासाठी नगरपरिषदांनी पाठपुरावा करावा.

**१२.** पाणीपुरवठ्यावरील खर्चात कर्मचा-यांचे वेतन, विजेची बिले, दुरूस्तीवरील खर्च आणि रसायनावर खर्च याचा एकंदर खर्चात समावेश होतो. पाणीपुरवठा योजनांवर होणा-या खर्चाचे प्रमाण फार अधिक असून विशेष

पाणीपट्टीद्वारे उत्पन्न फारच कमी प्रमाणात असल्याने सर्वच नगरपरिषदा दरवर्षी तुटीच्या अवस्थेत आहेत. विशेष पाणीपट्टीचे शासनाने विहित केलेले किमान दर सुध्दा अनेक नगरपरिषदांमध्ये अजून लागू करण्यात आलेले नाहीत. ज्या दराने विशेष पाणीपट्टी आकारली जात आहे त्यानुसार वसूली केली जात नाही. शासनाने विहित केलेले किमान दर तातडीने सर्व नगरपरिषदांनी लागू करावेत. शिवाय पाणीपुरवठा योजना आर्थिक दृष्ट्या स्वयंनिर्भर बनविण्याकरीता विशेष पाणीपट्टीच्या दरात दरवर्षी सुधारणा करावी. शासनाच्या आदेशानुसार पाणीपुरवठा योजना नगरपरिषदांनी ताब्यात घेतल्यावर पाणीपट्टीची वसूली विजेच्या देयकाप्रमाणे मिटर आकारणीनुसार करावी म्हणजे वसूली नियमित होईल व जबाबदारीने होईल. तसेच पाणी खरेदीची थकीत रक्कम वेळेवर भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**१३.** राज्यात अनेक पाणी पुरवठा व मलनिसारण योजना कार्यान्वित झाल्या असून त्या योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे करण्यात येते. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर योजनेची कार्यक्षमपणे देखभाल व दुरुस्ती करून नागरीकांना शुध्द व पर्याप्त पाणी पुरवठा करणे ही त्या संस्थांची वैधानिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्याच्या दृष्टीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणी पुरवठा व्यवस्था कार्यक्षम ठेवण्यासाठी,

१. पाणी गळती कमी करणे,
२. जलशुध्दीकरण केंद्राच्या यंत्र सामुग्रीची निगा राखणे,
३. अवैध नळ जोडण्या नियमित करणे अथवा काढून टाकणे,
४. नळ जोडण्यांना मीटर बसविणे आणि
५. केलेल्या पाणी पुरवठ्याचे बिलिंग व वसूली प्रभावीपणे करणे या व इतर आवश्यक बाबी करणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पाणी पुरवठा योजना तोटयात चालण्याची खालील कारणे निदर्शनास आलेली आहेत,

१. पाणीपट्टीचे दर पर्याप्त नाहीत व पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण फारच कमी आहे.
२. अवैध नळ जोडण्या, पाणी गळती, मोफत स्टॅन्डपोस्टवर पाण्याचा बिनहिशेबी वापर
३. पाणीपट्टीची बिलींग व वसुलीची प्रभावी व्यवस्था नसणे
४. विहित केलेल्या किमान दरापेक्षा कमी दराने पाणीपट्टी आकारली जाणे

**१४.** पाणी पुरवठा योजना आर्थिक दृष्ट्या सक्षमरित्या चालविली जात नसल्यास, योजनेची कार्यक्षमता व आयुष्य तर कमी होते, शिवाय पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील नगरपालिकेवरील कर्ज देखील मोठ्या प्रमाणात थकविली जाते. त्यामुळे या योजना स्वयंसंतुलित नसतात. साहजिकच अश्यावेळी पाणी पुरवठा योजनांच्या संचलन, देखभाल व दुरुस्तीमध्ये येणारी तूट ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मिळणा-या इतर उत्पन्नातून भरुन काढली जाते. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना इतर विकासाची कामे घेणे शक्य होत नाही अथवा कर्जाच्या व्याजासह परतफेडीत कसूर करून अशी कामे घेतली जातात.

**१५.** या सर्व बाबींचा विचार करुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणीपट्टीचे दर ठरविताना अवलंबिण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने आपले अधिनस्त सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये पाणी पट्टी व मल निस्सारण सेवा यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत असून या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

अ. अनधिकृत नळ जोडण्या शोधून त्या खंडित करून घ्याव्यात किंवा धोरणारूप नियमित करून घ्याव्यात, जेणेकरून उत्पन्नात वाढ होईल.

आ. पाणी पुरवठा योजनांचे संबंधी दरवर्षी स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करण्यात यावा तसेच पाणी लेखापरीक्षण व उर्जा लेखापरीक्षण करून घ्यावे.
इ. पाणी पुरवठा अस्थापना तसेच देखभाल दुरुस्ती खर्च योजनाबद्ध पद्धतीने कमी करण्यात यावा.
ई. पाणी पट्टीचे दर हे नळ जोडणीच्या व्यासाशी निगडीत न ठेवता व्हॉल्यूमेट्रिक पद्धतीने रु. प्रती किलो लिटर या स्वरुपात विहित करावेत.
उ. ग्राहकांना पाणी पुरवठा विहित जल मापकाद्वारे करण्यात यावा.
ऊ. नागरी भागात पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची किंमत काढण्यात यावी. त्यानंतर प्रवर्गनिहाय पाणी पुरवठ्याचे प्रमाण व त्यावरून प्रवर्गनिहाय पाण्याचा दर (घरगुती, बिगर घरगुती, संस्थात्मक, व्यावसायिक, औद्योगिक इ.) काढण्यात यावा.
ऋ. पाणी निर्मितीचा खर्च काढल्यानंतर पाणीपट्टी वसुलीच्या प्रमाणाचा विचार करून पाण्याचे दर ( प्रवर्ग निहाय) ठरविण्यात यावेत.
ल. उत्तरोत्तर वसुलीचे प्रमाण वाढून १००% वसुलीसाठी प्रयत्न करावेत.
केंद्र शासनाने नागरी भागामध्ये पायाभुत सुविधा स्थापन करण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय

**१६.** नागरी पुनरुत्थान अभियान (JNNURM) व लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सुविधा योजना (UIDSSMT) हे कार्यक्रम सुरु केले आहेत. या अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता योजना तसेच इतर योजनांना मंजूरी व अनुदान देताना केंद्र शासनाने काही सुधारणा करणे बंधनकारक केलेले आहे. त्यामध्ये नागरी सेवांच्या संचलन, व्यवस्थापन, देखभाल दुरुस्तीचा खर्च भरुन काढण्यासाठी ग्राहकांकडून योग्य शुल्क आकारणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून शासन निर्णय क्र. संकीर्ण- २००९/प्र.क्र.२०७/०९/न.वि.२० दिनांक ०२/०८/२०१० अन्वये,

A) पाणीपट्टीच्या दराची आकारणी ठरविण्याची विहीत पद्धत व
B) मलनिस्सारण आकार ठरविण्यासाठी पद्धत बाबत यापूर्वीच मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली असून सदर शासन निर्णयाचे पालन करणे सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांना बंधनकारक आहे.

**१७.** केंद्र शासनाच्या वित्त आयोगाचे अनुदान राज्यास प्राप्त होण्याच्या दृष्टीने राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती यांची पाणीपट्टी बाबतची खालीलप्रमाणे माहिती सिटी फायनान्स पोर्टल द्वारे संकलित केली जाते.

१. मालमत्ता कर वसूली
२. मालमता कर वसूलीमधील वाढ (YOY)
३. पाणी पट्टी वसूली
४. पाणीपट्टी वसूलीमधील वाढ (YOY)
५. पाणीपुरवठा योजनांचे देखभाल दुरुस्ती खर्च (O&M cost)

वरील मुद्द्यांबाबत नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी सिटी फायनान्स पोर्टल वर सादर केलेल्या माहितीच्या आधारे राज्यास प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे प्रमाण ठरत असते. त्यामुळे सदर अनुदान प्राप्त होण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी वसूली, पाणी निर्मितीचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च, जलमापके प्रमाण या व इतर बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. सबब, उपरोक्त देण्यात आलेल्या सूचना तसेच आनुषंगिक शासन निर्णय यामधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे . तसेच या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा विभागीय कार्यालय प्रमुख यांनी वेळोवेळी आढावा घेऊन त्याबाबत संचालनालयास अवगत करण्यात यावे.

**१८.** नगरपरिषदेच्या वतीने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०५ व १०८ अन्वये विहित करांचे व शुल्कांचे तसेच उक्त अधिनियमांचे कलम ३२२ अन्वये उत्पन्नाशी संबंधित उपविधीव्दारे प्राप्त होणारे उत्पन्नास नगरपरिषदेस वंचित ठेवण्यात आल्यास, त्याची जबाबदारी, असे निर्णय

घेणे ज्यांचे कायद्यातील तरतुदीन्वये कर्तव्य आहे त्यांच्यावर राहील. अशा झालेल्या आर्थिक नुकसानींची भरपाई पण संबंधितांकडून करणे आवश्यक ठरेल, याची ही सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

Signed by
Manoj Vijay Ranade
Date: 15-10-2024 18:00:10

**(मनोज रानडे भा.प्र.से)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :**

१) मा. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये ( सर्व).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य ,कोकण भवन.नवी मुंबई ,

४) सह संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा.सर्व विभाग,

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).

६) निवडनस्ती.

**प्रति,**

१) जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालये ,(सर्व).

२) अध्यक्ष ,प्रशासक/ नगरपरिषद नगरपंचायत / (सर्व).

३) मुख्याधिकारी, नगरपरिषद नगरपंचायत / (सर्व).